॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited

## प्रवेश व पात्रता विभाग

जा.क्र. कबचौउमवि/६/प्रपा/ १५४/२०२४ दि.१८.१०.२०२४

**अत्यंत महत्वाचे**

**प्रति,**
**क.ब.चौ.उ.म.वि. संलग्नीत सर्व महाविद्यालये / परिसंस्था यांचे**
**मा. प्राचार्य / संचालक आणि विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा/विभाग**
**यांचे मा.संचालक / विभागप्रमुख यांना..**

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२३-२४ आणि शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची Academic Bank Credit (ABC) साठी नोंदणी करण्यासंदर्भात आयोजित करण्यात आलेल्या दूरदृष्य (online) प्रणालीव्दारे आयोजित करण्यात आलेल्या सभेस उपस्थित राहणेबाबत

**महोदय / महोदया,**

आपणांस विदितच आहे की, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ आणि शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार ( NEP-2020) प्रवेश देण्यात येत आहे.यानुसार संलग्नीत **सर्व महाविद्यालये / परिसंस्था** आणि **विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभागांमध्ये** प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची **Academic Bank Credit (ABC)** साठी नोंदणी करणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत महाविद्यालये / परिसंस्था आणि विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभागांकडून प्रवेश व पात्रता विभागात विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज जमा होत आहे.काही महाविद्यालये/ परिसंस्था आणि शैक्षणिक प्रशाळांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी आणि विद्यार्थीनीचे आधार कार्ड अद्यावत (**Update**) नसल्याने अशा विद्यार्थ्यांची **Academic Bank Credit (ABC)** साठी नोंदणी करण्यास अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास येत आहे.परंतू विद्यार्थ्यांची **Academic Bank Credit** पोर्टलवर नोंद होणे अत्यावश्यक आहे.

या संदर्भात सर्वनी विद्यार्थ्यांची ॲकेडमिक बँक क्रेडीट पोर्टलवर नोंदणी करण्यासंदर्भात सर्वांनी प्रयत्नशिल राहून जबाबदारी पार पाडणे अत्यांवश्यक आहे.मात्र तसे आढळून येत नसल्याचे विद्यापीठाच्या निदर्शनास येत आहे

तरी उपरोक्त बाब लक्षांत घेऊन **प्रा.एस.टी.इंगळे, प्र-कुलगुरु** यांच्या मार्गदर्शनाखाली **मंगळवार दि.२२.१०.२०२४** रोजी **सकाळी ११.००** वाजता **दूरदृष्य** (online) प्रणालीव्दारे सभा आयोजित करण्यात आली आहे.कृपया सभेस आपण प्रवेशासंदर्भात काम पाहणारे कर्मचारी आणि नोडल ऑफीसर ( **ॲकेडमिक बँक क्रेडीट** ) यांच्यासह उपस्थित राहावे ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

(रा. चि. ठाकरे)
**सहा.कुलसचिव**
अभ्यास मंडळ व प्रवेश पात्रता विभाग

**Meeting ID: 81319694357 & Password : 005836**

**प्रत माहितीसाठी :-** १.मा.कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
२.मा.प्र-कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
३.मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, परीक्षा विभाग, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
४.समन्वयक, ई-सुविधा केंद्र, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.